**अतितात्काळ/कालमर्यादा**

क्र.पोमसं/३१/ घबांअ-ऑनलाईन बँकेमार्फत/प्रमाणपत्र/१७५/२०२४

मुंबई,दि.29/१०/२०२४

विषय :- राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँका/वित्तीय संस्थामार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत

******

उपरोक्त विषयाबाबत शासन निर्णय गृह विभाग बीयुडी क्र.-०९२२/प्र.क्र.१९६/आस्था-१, दि.१४/१०/२०२२ अन्वये राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँकामार्फत कर्जव्यवस्था करण्याबाबत दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु केलेली योजना पुन्हा सुरु करण्यास मान्यता दिली आहे.

त्याअनुषंगाने ज्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे अर्ज सॉफ्टवेअरमध्ये भरण्यात आले आहेत. परंतु त्यांना अद्याप घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात आले नाही. त्यांच्या कागदपत्राच्या अनुषंगाने संबंधित विभाग/कार्यालय प्रमुख यांनी सोबत जोडल्याप्रमाणे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

तरी, खालील घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर प्रकरणी व्यक्तीशः लक्ष घालुन सोबत जोडलेल्या नमुन्यानुसार त्यांचे कार्यालयाचे प्रमाणपत्र या कार्यालयास दि.२५/१०/२०२४ पर्यंत न चुकता ई-ऑफीसद्वारे पाठवावे, ही विनंती. तसेच त्यासोबत **पोलीस अधिकारी/अंमलदार यांची यादी खालील विहीत नमुन्यात इंग्रजीमध्ये अर्ज भरल्याच्या दिनांकानुसार पाठवावी.**

| Sr. No. | Name | Sevarth ID | Ddate Of Application | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |
| 2 | | | | |

**(डॉ. आरती सिंह )**
विशेष पोलीस महानिरीक्षक(प्रशासन)
पोलीस महासंचालक,म.राज्य, मुंबई यांचे कार्यालय

प्रति,

महासंचालक, दहशतवाद विरोध पथक महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस आयुक्त, पुणे शहर/ अमरावती शहर/औरंगाबाद शहर/ नागपूर शहर/ नाशिक शहर/ नवी मुंबई/सोलापूर शहर/ ठाणे शहर/ मिरा-भाईंदर-वसई-विरार /लोहमार्ग, मुंबई/ पिंपरी चिंचवड
अपर पोलीस महासंचालक, फोर्सवन मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग,पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, मुंबई
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग पुणे/ दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे/ पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण/

पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण

पोलीस अधीक्षक, अकोला/ अमरावती ग्रा./ औरंगाबाद ग्रा./बीड/ बुलडाणा/धुळे/गडचिरोली/ गोंदिया/ हिंगोली/ जळगांव/ जालना/ कोल्हापूर/ लातूर/ नागपूर ग्रा./ नांदेड/ नंदूरबार/ नाशिक ग्रा./ पालघर/ परभणी/ पुणे ग्रा./ लोहमार्ग, नागपूर/ लोहमार्ग, औरंगाबाद/सांगली/ सातारा/ सोलापूर ग्रा./ ठाणे ग्रा./ वाशिम/ यवतमाळ/ अहमदनगर/चंद्रपूर/ सिंधुदूर्ग/भंडारा/ रायगड/रत्नागिरी/

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर

प्रचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे, बाभळगांव लातूर/ जालना/ खंडाळा/रा.रा.पो.बल नानवीज, दौंड/ नागपूर/ अ.अ.प्र.के., नागपूर/ UCTC- मुंबई

समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१/२/३/४/५/६/७/८/९/१०/११/१२/१३/१४/१५/१६/ १९

समादेशक, राज्य अपत्ती प्रतीसाद दल, धुळे/ नागपूर

पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, कोल्हापूर/ नाशिक

अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर/नांदेड

# प्रमाणपत्र

शासन निर्णय गृह विभाग क्र.-०९२२/प्र.क्र.१९६/आस्था-१, दि.१४/१०/२०२२ अन्वये राज्यातील पोलीस दलातील अधिकारी/अंमलदार यांना घरबांधणीसाठी बँकामार्फत कर्जव्यवस्था करण्याबाबत दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु केलेली योजना पुन्हा सुरु करण्यास मान्यता दिली आहे.

त्याअनुषंगाने पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्या मार्फतीने नवीन कर्ज उभारणीसाठी ------------------------ (कार्यालयाचे नाव नमूद करावे) या कार्यालयातर्फे खालीलप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१. उपरोक्त नुसार या कार्यालयामार्फत असे प्रमाणित करण्यात येते की, घर बांधणी अग्रिम योजनेकरीता पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचे एकूण--------------अर्जासाठी रु.------------इतक्या रकमेची मागणी पोलीस महासंचालक कार्यालयास सादर करण्यात आली आहे.(सोबत यादी जोडली आहे.)(टिप:- यादीवर घटक प्रमुखांची पदनामासह स्वाक्षरी करावी.)

२. घरबांधणी अग्रिम मंजूर केल्यानंतर घरबांधणी अग्रिमाच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे संबंधीत पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्याकडुन तात्काळ घेण्यात येतील. संबंधीत पोलीस अधिकारी/अमलंदार बडतर्फ झाल्यास त्यांच्या घरबांधणी अग्रिमाची रक्कम दि.०१/०३/२०२४ च्या शासन निर्णयामधील विहीत तरतुदीनुसार वसुल करण्याची सर्वस्व जबाबदारी या कार्यालयाची आहे.

३. घरबांधणी अग्रिमाकरीता अर्ज केलेल्या सर्व पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी नोंदणीकृत गहाणखत, वैयक्तिक बंधपत्र/ जामीनखत इत्यादी कागदपत्रांची पूर्तता केली आहे, सदर कागदपत्रे या कार्यालयाच्या ताब्यात सुरक्षित आहेत.

४. घरबांधणी अग्रिमाच्या हप्त्याची रक्कम पोलीस महासंचालक कार्यालयाच्या बँक खात्यावर प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत न चूकता जमा करण्यात येईल.

५. पोलीस गृहनिर्माण महामंडळाला मुद्दल/ व्याज वसुलीची रक्कम वेळेवर परत करण्याची जबाबदारी या कार्यालयाची आहे. तसेच या कार्यालयाद्वारे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयास दरमहा एकूण वसुलीचा अहवाल पत्राद्वारे न चुकता पाठविण्यात येईल.

६. प्रत्येक कर्जदार पोलीस अधिकारी/ अंमलदाराकडून त्यांच्या वेतनातून मासिक हप्ता कपात करण्यात येईल, आणि कर्जाची रक्कम व्याजासह पूर्ण परतफेड होईपर्यंत मासिक हप्त्याची रक्कम पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र, राज्य मुंबई यांच्याकडे जमा करण्यात येईल. याबाबतचे अग्रिमधारकाचे संमतीपत्र या कार्यालयाकडे जमा केले आहे.

७. घरबांधणी अग्रिम घेतलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी घरबांधणी अग्रिम व्याजासहित परतफेड केल्यास संपूर्ण कर्जाची रक्कम व्याजासहित परतफेड केले असल्याचे पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी खात्री करून तसे पोलीस गृहनिर्माण महामंडळास कळविल्याशिवाय नोंदणीकृत गहाणखत, वैयक्तिक बंधपत्र/ जामीनखत इत्यादी कागदपत्रे संबंधित अग्रिमधारकास परत केली जाणार नाहीत.

८. शासकीय कर्मचाऱ्याकडून घरबांधणी अग्रिम अथवा व्याजाची रक्कम वसुल करावयाची शिल्लक राहिल्यास संबंधित कर्मचाऱ्याची शिल्लक रक्कम महामंडळास त्वरीत एकररकमी भरणा करण्यात येईल. अन्यथा अशा कर्मचाऱ्याचे घर/सदनिका शासनाकडे गहाण असल्याने दि.०१/०३/२०२४ च्या शासन निर्णयामधील विहीत तरतुदीनुसार घटक प्रमुख यांचेकडुन सक्षम प्राधिकारी म्हणुन सदर घर/ सदनिका लिलाव करून त्या रकमेतून उर्वरीत मुद्दल/ व्याजाची वसुली करून महामंडळास भरणा करण्यात येईल.

९. घरबांधणी अग्रिम घेतलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांनी शासन निर्णय क्र.घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम, दि.०१.०३.२०२४ मधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता केली असल्याची घटक कार्यालय/ आहरण व संवितरण अधिकारी यांनी खात्री केली आहे.

१०. अग्रिमधारकास मंजूर करण्यात आलेले अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे, त्या कारणाकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील शासन निर्णय क्र.घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम, दि.०१/०३/२०२४ मधील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसुरदाराकडून दि.०१/०३/२०२४ च्या शासन निर्णयामधील विहीत तरतूदीनुसार अग्रिमाची रक्कम प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याज यासह एकरकमी वसूल करण्यात येईल.

११. घरबांधणी अग्रिम मंजूरी करीता अर्ज सादर केलेले पोलीस अधिकारी/अंमलदार हे सध्या निलंबीत /बडतर्फ नसून त्यांना सेवेतून कमी करण्यात आलेले नाही.

**संबंधित कार्यालय प्रमुखाची पदनामासह स्वाक्षरी**
(पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक/समादेशक)